RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-49 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thuseday 24 June 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ४९ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ मंगळवार, दि. २४ जुन २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये

**आजचा शुभ विचार**

"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वत:च्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

चला तर आपल्या सेवेत आम्ही आहोत

जेव्हा गरज असेल प्रसिद्धीची किंवा आपल्या व्यवसायाला चालना देण्याची दैनिक स्वराज्यदूत आपल्या पाठीशी आहे

आम्ही देत आहोत आपल्याला जलद गतीने प्रसिद्धीसाठी छापील वृत्तपत्र आणि इ पेपर मध्ये जाहिरातीचा पर्याय

* फक्त २९९९ रुपयात ३० दिवस आपली कोणतीही जाहिरात प्रसिद्ध केली जाईल.

संपर्क -मो. ८४४६६ ७३६७७

स्वराज्यदूत NEWS MEDIA CHANNEL

वेबसाईट ला भेट द्या www.swarajyadoot.com

# एम पी एस सी चा ऐतिहासिक निर्णय भरती प्रक्रियेकरिता पर्सेंटाईल पद्धती लागू

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------




महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आलेली आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या पुढील परीक्षेच्या गुणांकनावर काय परिणाम होणार हे महत्त्वाचे ठरणार आहे. आयोगाने स्पर्धा परीक्षा प्रमाणेच इतर सरळ सेवा भरती प्रक्रियेसाठी आता गुणांकणाची कुठली प्रक्रिया लागू होणार यासंदर्भात परिपत्रक जाहीर केले आहे. आयोगाच्या परिपत्रकात कुठली माहिती देण्यात आलेली आहे ते सविस्तर जाणून घेऊया. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा पोलीस उपनिरीक्षक अशा विविध परीक्षांसह सरळ सेवा भरती प्रक्रिया राबवली जाते. यामध्ये ग्रुप क पदांचा समावेश असतो. आयोगाने त्याच्या परिपत्रकांनुसार यापुढे स्पर्धा परीक्षेप्रमाणेच सरळसेवा भरतीप्रक्रियेकरिता किमान पर्सेंटाईल अर्हतामान लागू करण्यात आला आहे. आयोगाच्या कार्य नियमावलीतील नियम क्रमांक ८ (vi) संदर्भात दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजीच्या सुधारणेसह स्पर्धा परीक्षांप्रमाणेच सरळसेवा भरतीप्रक्रियांकरीता घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षांसाठी देखील किमान पर्सेंटाईल अर्हतामान लागु करण्याचा निर्णय आयोगामार्फत घेण्यात आला आहे. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच, सदर निर्णय आयोगाकडुन यापुढे घेण्यात येणा-या चाळणी परीक्षांना लागू असेल . पर्सेंटाईल ही प्रणाली उमेदवाराच्या गुणांची तुलना इतर सर्व उमेदवारांच्या गुणांशी करते आणि त्या उमेदवाराने किती टक्के उमेदवारांपेक्षा चांगली कामगिरी केली आहे हे दर्शवते. पर्सेंटाइल म्हणजे ० ते १०० पर्यंतची संख्या जी दर्शवते की विशिष्ट डेटा पॉइंटच्या किती टक्के मूल्ये खाली आहेत. उदाहरणार्थ, जर एखाद्या उमेदवाराची टक्केवारी ९० असेल, तर त्याचा अर्थ असा की त्याने किंवा तिने इतर ९०% उमेदवारांपेक्षा चांगली कामगिरी केली. एमपीएससी परीक्षेत, प्राथमिक आणि मुख्य परीक्षेचे गुण सामान्य करण्यासाठी पर्सेंटाइलचा वापर केला जातो, विशेषत: जेव्हा परीक्षा अनेक शिफ्टमध्ये घेतली जाते. यामुळे वेगवेगळ्या शिफ्टमध्ये परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांना योग्य वागणूक मिळते याची खात्री होते. समजा एका परीक्षेत १००० उमेदवार आहेत आणि एका उमेदवाराला ८०% गुण मिळाले आहेत. जर ७०० उमेदवारांनी त्या उमेदवारापेक्षा कमी गुण मिळवले असतील, तर त्या उमेदवाराचे टक्केवारी ७० (७००/१००० * १०० = ७०%) असेल. याचा अर्थ असा की उमेदवाराने ७०% उमेदवारांपेक्षा चांगली कामगिरी केली. पर्सेंटाइल सिस्टीममुळे वेगवेगळ्या शिफ्टमध्ये परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांना योग्य वागणूक मिळते याची खात्री होते.

# गंगापूर धरणातून विसर्ग वाढला ; नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



नाशिक जिल्ह्यात गेले चार पाच दिवसात पावसाची संततधार कायम असल्याने , जिल्ह्यातील प्रमुख धरणांचा पाणीसाठा जलद गतीने वाढत आहे . पाण्याचा साठा वाढल्याने धरणांमधून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे . गंगापूर धरण क्षेत्रात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने नद्या, नाले दुथडी भरुन वाहत आहे. आज दुपारपासून धरणातून ६,१६० क्युसेक वेगाने धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवला आहे . यापूर्वी धरणातून ४ हजार क्यूसेक विसर्ग सुरू होता. धरण क्षेत्रात पावसाचा जोर वाढल्यास पाण्याचा विसर्ग आणखी वाढवण्यात येईल, अशी माहिती धरण प्रशासनाकडून देण्यात आली आहे. नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशाराही देण्यात आला आहे . गंगापूर धरणातून मोठ्या प्रमानात होणाऱ्या विसर्गामुळे गोदावरी नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे, रामकुंड परिसरातील पूल आणि छोटी-मोठी मंदिरे पाण्याखाली गेली आहेत. दुतोंड्या मारुतीच्या गुडघ्यापर्यंत पाणी आले आहे. गोदावरी नदीला पुराचा संभाव्य धोका लक्षात घेता, प्रशासनाकडून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. स्थानिक आपत्कालीन यंत्रणाही सतर्क ठेवण्यात आल्या आहे. ऐन मे महिन्यात शेतीच्या मशागतीच्या वेळी पावसाने हजेरी लावली , मे महिन्यापूर्वी होणारी शेतीची मशागतीची कामे आणि पेरण्या पावसामुळे खोळंबल्या आहेत . शेतीची कामे रखडल्याने आता शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे . पावसाने दमदार हजेरी लावल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे . टोमॅटो लागवड व इतर धान्य उत्पादनासाठीच्या कोलमडलेल्या नियोजनातून सावरण्याच्या प्रयत्न शेतकरी करत आहे .

# बडगुजर यांच्या भाजपा प्रवेशानंतर ठाकरे गटाचा दुसरी फळी सक्रिय करण्यावर भर, सर्व प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत प्रभागनिहाय बैठका

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------




सत्ताधारी राजकीय पक्षांकडून फोडाफोडीच्या राजकारणातून पक्षाला सातत्याने धक्के दिले जात असल्याने शिवसेनेने (उद्धव ठाकरे) शिवसैनिकांची मोट बांधून त्यास प्रत्युत्तर देण्याची तयारी चालविली आहे. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षातर्फे घेण्यात येणाऱ्या प्रभागनिहाय बैठकांमधून पक्ष सांभाळण्याची जबाबदारी सामान्य शिवसैनिकांवर आल्याचा संदेश देण्यात येत आहे. नेते, माजी नगरसेवकांनी पक्षांतर केले तरी मूळचा शिवसैनिक हललेला नाही. दुसरी फळी सक्रिय करून निवडणुकीची मोर्चेबांधणी केली जात आहे.

शिवसेना दुभंगल्यापासून अनेक माजी नगरसेवक आणि पदाधिकारी शिंदे गटात गेले. अलीकडेच पक्षातून हकालपट्टी झालेले उपनेते सुधाकर बडगुजर हे माजीमंत्री आणि काही माजी नगरसेवकांना घेऊन भाजपमध्ये प्रवेशकर्ते झाले. ठाकरे गटात मोठी पडझड सुरू आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, मातोश्रीवरून बैठका घेऊन निवडणुकीच्या तयारीला लागण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार नाशिकरोड, पंचवटीसह अन्य काही विभागात आठहून अधिक बैठका झाल्या आहेत. या माध्यमातून संभाव्य पडझड रोखणे आणि शिवसैनिकांना सक्रिय करण्यावर लक्ष केंद्रीत केल्याचे दिसून येते.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी मराठी माणसांच्या न्याय हक्कासाठी स्थापन केलेला हा पक्ष आहे. परंतु, कोणीतरी येते आणि पक्ष चोरून नेते. ज्यांना बाळासाहेबांनी मोठे पद दिले, मोठे केले, तेच आता स्वत:च्या फायद्यासाठी पक्ष सोडून जात आहेत. त्यामुळे हा पक्ष सांभाळण्याची जबाबदारी आता आपल्यासारख्या सामान्य शिवसैनिकांवर आल्याची जाणीव पदाधिकाऱ्यांकडून करून दिली जाते. ती जबाबदारी पार पाडण्याची वेळ आता आल्याकडे बैठकीतून लक्ष वेधले जाते. या बैठकीत खासदार राजाभाऊ वाजे, जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी यांच्यासह उपनेते दत्ता गायकवाड आणि सुनील बागूल, माजी आमदार वसंत गिते, राज्य संघटक विनायक पांडे यांच्याकडून मार्गदर्शन केले जात आहे.

> नाशिकरोडमधील सर्व प्रभागात बैठका पूर्ण झाल्या. पंचवटी आणि अन्य काही प्रभागात बैठका सुरू आहेत. प्रशासकीय राजवटीत शहराची काय अवस्था झाली, हे मुख्यत्वे शहरवासीयांसमोर मांडले जाईल. माजी नगरसेवक आणि काही नेते पक्ष सोडून गेले असले तरी शिवसैनिक कुठेही गेलेला नाही. पक्षाची दुसरी फळी तयार आहे. अनेकांना इच्छा असूनही निवडणुकीत कधी संधी मिळाली नव्हती. सर्वांच्या सोबतीने आता तयारी केली जात आहे.
>
> **डी. जी. सूर्यवंशी**
> **(जिल्हाप्रमुख, ठाकरे गट)**

महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदुत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!

महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये

कौतुक तुमच्या कार्याचे

उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत dainikswarajyadoot@gmail.com या इ-मेल वर पाठवायचा आहे.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449

# साक्री येथे २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



शरीर माध्यम खलु धर्म साधनम या उक्तीला अनुसरून २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधत साक्री येथील पंचायत समिती , तहसील कार्यालय व न्यू इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय साक्री येथे. आंतरराष्ट्रीय योग दिवस अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. पतंजली योगपीठ हरिद्वार चे योगशिक्षक श्री दिलीप बोरसे यांनी योगावर सुंदर असे मार्गदर्शक करून प्रात्यक्षिक करून दाखविले. प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती साक्री चे गटविकास अधिकारी श्री शशिकांत सोनवणे साहेब, प्रवासी महासंघाचे अध्यक्ष श्री सुरेश भाऊ पारेख कासारे ,व शिवाजी प्रिंटिंग प्रेस चे संचालक दादा साहब रामराव पाटिल बैंक चे मैनेजर श्री केतन भाई शाह साहेबआवर्जून उपस्थित होते. पंचायत समिति साक्री चे अतिरिक्त गट विकास अधिकारी श्री आर के देवरे साहेब , गटशिक्षण अधिकारी श्री राजेंद्र पगारे साहब, विद्यालयाचे प्राचार्य आदरणीय श्री प्रमोद बेडसे सर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे सुंदर नियोजन करण्यात आले. विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री बागुल सर यांनी प्रास्ताविक मांडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पतंजलीचे कार्यकर्ते काकासाहेब श्री सुभाष बोरसे कावठे, श्री दीपक गुरव ,(भारत स्वाभिमान तालुका प्रभारी )व डॉक्टर प्रीतम तोरवणे (तालुका प्रभारी पतंजली योग समिती)यांचे उत्तम सहकार्य लाभले.

संपादकीय

# बडगुजर यांचा प्रवेश; काही पेच, काही संदेश

उबाठातून भाजपात स्वागत करण्यात आलेल्या सुधाकर बडगुजर यांच्या प्रवेशाच्या माध्यमातून प्रदेश पक्षश्रे ेष्ठींनी स्थानिक पातळीवर व्यापक दृष्टिका ेन स्वीकारण्याचा संदेश दिला आहे; मात्र अनेकांचा विरोध-आक्षेप असलेल्या या निर्णयामुळे पक्षात काही पेचही निर्माण झाल्याशिवाय राहणार नाहीत.

नाशिक शहरातील सर्वच लहानमोठे प्रश्न - समस्या बाजूला पडून कमालीचे महत्त्व प्राप्त झालेल्या एका प्रश्नावर अखेर तोडगा निघाला. उबाठा गटाचे एक स्थानिक मातब्बर नेते सुधाकर बडगुजर यांचा भाजपात प्रवेश होणार, की नाही याचा फैसला मंगळवारी बडगुजरांच्या बाजूने लागला. नाशिक शहर आणि काही प्रमाणात जिल्ह्यामध्ये दोनतीन आठवडे याच विषयावर चर्चा होती. अर्थात, याला माध्यमांनी दिलेल्या तडाखेबंद प्रसिद्धीचाही हातभार लागला. त्यामुळे अगदी राज्यपातळीवरही या संदर्भात औत्सुक्य निर्माण झाले होते. वृत्तवाहिन्यांवरील हेडलाइन्समध्ये ही एक लाईन होतीच.

कुंभमेळ्याच्या कामांचे काय होणार, पावसाळा अंमळ आधीच सुरू झालेला असताना रस्त्यांच्या बिकट अवस्थेवर काय उपाय करणार, शहरात विविध ठिकाणी रोजच होणाऱ्या वाहतूक कोंडीवर कोणती कायमस्वरूपी योजना करणार, ठिकठिकाणी लोक 'पाणी, पाणी' ओरडत असताना त्यांची तहान कशी भागवणार असे सारे किरकोळ प्रश्न आणि असुविधा या काळात जणू सारेच विसरून गेले होते. केवळ बडगुजरच नव्हे, तर इतरही अनेक स्थानिक नेत्यांच्या इकडून तिकडे जाण्याने सर्वसामान्य माणसाच्या जीवनावर काय परिणाम होणार आहे, असा विचार - ज्याच्या खिजगणतीतही हा माणूस नसतो - त्यांनी करण्याचे काहीच कारण नव्हते; पण खुद्द हा सामान्य माणूसही या राजकीय चर्चांमध्ये रमून गेला होता. असो.

ज्यांच्या राजकीय हुशारीने एवढे मोठे फुटेज घेतले आणि रकाने व्यापले, ते श्री. बडगुजर मुळात तसे राजकारण नव्हेत. ते मूळचे महापालिकेतील मोठे कंत्राटदार. त्यांनी राजकारणात प्रवेश करायलाही जेमतेम १७-१८ वर्षे झालेली; पण धडाक्याने पुढे जाण्यात माहीर असलेल्या बडगुजरांनी पूर्वीची एकसंघ शिवसेना आणि नंतरची उबाठा यात बिनीचे स्थान प्राप्त केले. लहानमोठी लोकाभिमुख कामे करून प्रभागाला आदर्श करण्यासारख्या बाबी त्यांची आणखी एक जमेची बाजू. मात्र, दीर्घ काळ काम करत राहून संयमाने योग्य संधीची वाट पाहत राहणे हा त्यांचा पिंड नव्हता आणि यापुढेही राहणार नाही. जे काही करायचे ते पूर्ण जोर लावून आणि त्यात कोणतीही कसूर सोडायची नाही, हाच त्यांचा खाक्या आहे. त्यामुळे एखादी गोष्ट ठरवली, की आत्मविश्वासाने ते त्या दिशेने पुढे जातात. त्यांचा हा आत्मविश्वास इतका दांडगा, की मंगळवारी खुद्द प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण बडगुजरांच्या पक्ष प्रवेशाची काही माहिती नसल्याचे सांगत असताना बडगुजर मात्र मुंबईच्या दिशेने समर्थकांसह निघालेही होते आणि 'सगळं काही ठरलंय, दुपारपर्यंत वाट पाहा', असं ठामपणे सांगत होते. बावनकुळे, चव्हाणांनी त्यांना मुंबईतील प्रदेश कार्यालयात तास दोन तास ताटकळत ठेवले खरे; पण शेवटी त्यांच्याच हस्ते बडगुजर यांचा समारंभपूर्वक पक्ष प्रवेश घडवण्यात आला. नाशिक शहरात या प्रवेशाला असणारा तीव्र विरोध पाहता या निष्ठावंत गटाला काहीसा दिलासा देण्यासाठी बडगुजर यांना था ेडेसे तिष्ठत ठेवले असावे. यावेळी मंत्री गिरीश महाजन मागे होते; पण या प्रवेशात त्यांचाच पुढाकार होता हे वेगळे सांगण्याची गरज नाही. खुद्द बडगुजर यांनाही थोडीफार धास्ती असावी, हे त्यांची देहबोली व प्रवेशोत्तर भाषण यातून जाणवले. 'महाजन हे संकटमोचक म्हणून प्रसिद्ध आहेत आणि त्यांनीच मलाही संकटातून बाहेर काढले', असे बडगुजर म्हणाले, त्यावरून त्यांनी अंदाज केला होता, तेवढा सोपा हा प्रवेश झालेला दिसत नाही.

त्यांना भाजपात प्रवेश देण्यास गेल्या विधानसभा निवडणुकीतील त्यांच्या विजयी प्रतिस्पर्धी आ. सीमा हिरे यांचा विरोध असणे तर साहजिकच होते; पण शहरातील भाजपाच्या अन्य दोन आमदारांनीही (देवयानी फरांदे व राहुल ढिकले) प्रदेश पक्षश्रेष्ठींकडे यास आक्षेप नोंदवला होता. मात्र, ताज्या घडामोडी पाहता फरांदे यांनी नवीन परिस्थितीशी जुळवून घ्यायचे ठरवलेले असावे; कारण, गुरुवारी मंत्री गिरीश महाजन यांच्या बडगुजरांनी केलेल्या स्वागताला आ. फरांदे यांनी हजेरी लावली. आ. हिरे व आ. ढिकले भविष्यात याला कसा प्रतिसाद (उघड असो, की छुपा) देतात, याची त्यांच्याच पक्षातील कार्यकर्त्यांना उत्सुकता असेल.

दुसरीकडे, बडगुजर यांच्या प्रवेशाला नाके मुरडली जात असली आणि त्यांच्यावरील आरोपांकडे अंगुलीनिर्देश केला जात असला तरी भाजपाच्या व्यापक धोरणानुसारच हा निर्णय झाला आहे, हे अमान्य करण्यात अर्थ नाही. तीनचार महिन्यांवर आलेली महापालिका निवडणूकही बडगुजर यांच्या प्रवेशाला सहाय्यभूत ठरली असावी; अन्यथा एरवी आणखी कालापव्यय होऊ शकला असता. मंत्री गिरीश महाजन यांना नाशिकमध्ये तसे अपयश माहीत नाही. गेल्या निवडणुकीत त्यांच्या दिग्दर्शनाखाली भाजपाने नाशिक महापालिकेत सहज बहुमत मिळवले. यावेळी भाजपाने 'शंभर अधिक' चे लक्ष्य ठेवले आहे. महायुतीने एकत्र निवडणूक लढवली तर सत्ताधारी सहज शंभरी पार करतील. भाजपा एकट्याच्या बळावर लढला तरीही हा आकडा त्यांना दुष्प्राप्य नाही. महाविकास आघाडीची (?) स्थानिक मंडळीही कदाचित खासगीत हे मान्य करील, एवढ्या गलितगात्र अवस्थेतून ते सध्या जात आहेत. पुढच्या शक्याशक्यता लक्षात घेऊनच भाजपा (आणि शिंदे शिवसेनादेखील) आपली ताकद वाढवण्याच्या प्रयत्नात आहे. निवडणूक जसजशी जवळ येत जाईल, तसतसे हे प्रयत्न अधिक वेग घेतील, हे सांगायला पाहिजे का?

# गावगाडाकार साहेबराव नंदनतात्या यांना चौथा जीवन गौरव पुरस्कार जाहीर

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------






मनुमानसी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व महावीर इंटरनॅशनल नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या वयाच्या पन्नास वर्षा पुढील विविध क्षेत्रात जसे की सामाजिक, अध्यात्मिक , सांप्रदाईक, आरोग्य संवर्धनसेवा, पत्रकारिता, कवी लेखक संपादक इ . .इ .क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तिंचा जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. २९ जुन २०२५ नाशिक येथे आयोजित करण्यात येणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यात साहित्यभूषण गावगाडाकार खांदेशभूषण कवी लेखक संपादक तात्यासो. साहेबराव नंदन यांना साहित्य नाट्य कला सेवेसाठी जेष्ठमान्यवरांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे . पुरस्काराचे स्वरूप शॉल , श्रीफळ, बुके, सन्मानपत्र, स्मृती चिन्ह , व मानाचा फेटा बांधून साहेबराव तात्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. तशा आशयाचे निवडपत्र संस्थेच्या संस्थापिका मेघाताई शिंपी व इतर मान्यवरांच्या नामनिर्देश असलेले निवड पत्र प्राप्त झाले आहे. साहेबराव नंदन तात्या मोक्षगंगेच्या काठावरील बागलाण तालुक्यातील ताहाराबादचे मुळ रहिवासी असून उद्योगानिमित्त गंगागोदावरी पंचवटी क्षेत्री नाशिक येथे स्थाईक असून, ते उत्तर महाराष्ट्रात साहित्यसेवा क्षेत्रात लोकप्रिय असून, उत्तम विचाराचे प्रवचनकार, नाट्यलेखक , कवी कादंबरीकार व संपादक म्हणून प्रसिद्ध आहेत. गावगाडा काव्यसंग्रह , परिसस्पर्श कादंबरी , सगर रत्न अंक , सगर सेवार्थी विशेषांक , सगर दिपोत्सव दिवाळी अंक, स्नेहबंध अंक इ. साहित्य त्यांचे प्रसिद्ध असून त्यांच्या सर्वच साहित्याला विविध संस्थांचे राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेता त्यांना अनेक संस्थानी सन्मानाने विविध पुरस्काराने सन्मानित केले आहे. शेकडो सन्मान पत्रांचे ते मानकरी ठरले आहेत. वयाच्या बासष्ठव्या वर्षी चौथा जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाल्याने सगर साहित्यिक परिवार व साहित्य क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# नांदगाव ग्रामीण रूग्णालय बनले दारूचा अड्डा

## गर्भवती महिलेच्या रक्त तपासणी साठी घेतले दोन हजार रूपये

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------






नांदगाव ग्रामीण रुग्णालयात प्रसूतीसाठी आलेल्या आदिवासी गर्भवती महिलेला दिवसभर ताटकळत ठेवून ' तिची प्रकृती गंभीर झाल्यावर नॉर्मल डिलिव्हरी होणार नाही' आता तिचे सिजेरियन करावे लागेल व दुसऱ्या खाजगी दवाखान्यात जाण्याचा सल्ला देणाऱ्या मद्यधुंद डॉक्टर व अन्य कर्मचाऱ्यांना शिवसैनिकांनी चांगलाच चोप दिला . घटनास्थळी दाखल झालेल्या पोलिसांकडे रुग्णाच्या नातेवाईकांनी संबंधितावर अँक्ट्रासिटी अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची मागणी केली दरम्यान जिल्हा शल्यचिकित्सकांनी संबंधित चौघांवर निलंबनाची कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर शिवसैनिकांचा राग निवळला.

तालुक्यातील जामदरी येथील सोनाली अशोक मोरे (वय १९ ) ही आदिवासी गर्भवती महिला गरोदरपणाचे दिवस पूर्ण झाल्याने प्रसूतीसाठी नांदगावच्या ग्रामीण रुग्णालयात सकाळी सहाला दाखल झाली होती. डॉक्टरांनी प्रसूती बाबत तपासणी करून अजून प्रसुतीला वेळ आहे. असे सांगून रक्त चेक करावे लागेल असे सांगून ' रक्त चेक करण्यासाठी दोन हजार रुपयाची मागणी केली ' ते पैसेही नातेवाईकांनी दिले ' त्यानंतर तिला प्रसूतीच्या वेदना सुरू झाल्याने डॉक्टरानीं तिला नॉर्मल डिलेव्हरी होणार नाही सिजेरियन करावे लागेल त्यासाठी खाजगी दवाखान्यात नेण्याचे सुचविले ' या प्रकरणाची माहिती शिवसेना युवा सेनेचे जिल्हाप्रमुख फरहान खान यांना समजताच ते शिवसैनिकांसह ग्रामीण रुग्णालयात दाखल झाले तेथे त्यांना उपस्थित असलेले डॉ. शांताराम राठोड अन्य कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत आढळून आले 'शिवसैनिकांनी प्रसूतीसाठी आलेल्या महिलेला दुसऱ्या दवाखान्यात जाण्याचा सल्ला का दिला याबाबत विचारणा केली त्यावर डॉ. राठोड खुलासा करण्याच्या अवस्थेत नसल्याने बघून संतप्त शिवसैनिकांनी डॉक्टर व अन्य मद्यधुंद कर्मचाऱ्यांना चांगलाच चोप दिला . यावेळी पोलिसांना पाचारण करण्यात आले ' रात्री उशिरापर्यंत पंचनामाचे काम सुरू होते . दरम्यान घडलेल्या प्रकाराची माहिती फरहान खान यांनी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. शिंदे यांच्या कानावर घातली व या प्रकरणाचे काही व्हिडिओ त्यांना बघण्यासाठी पाठवले जिल्हा शल्य चिकित्तक डॉ. शिंदे यांनी डॉ. शांताराम राठोड यांच्यासह वैद्यकीय अधीक्षक श्रीमती तुसे परिचारिका गिरीजा कुलकर्णी कर्मचारी अतुल आठवले या चारही कर्मचाऱ्यावर कारवाई करणार असल्याची माहिती दिल्यावर संतप्त शिवसैनिकांचा राग निवळला .

दरम्यान शहरातील डॉ तुसे यांना ग्रामीण रूग्णालयात पाचारण केल्यावर त्यांनी त्या महिलेची नॉर्मल डिलेव्हरी केली. महिलेला कन्यारत्न झाले.

दरम्यान, नांदगाव विधानसभा मतदारसंघाचे आ. सुहास कांदे यांनी या नवजात मुलीच्या संगोपनासाठी २१ हजार रुपयांची मदत करण्याची घोषणा केली आहे. तर याप्रकरणी ग्रामीण रुणालयाच्या विरोधात नांदगाव पोलिसांत रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. त्यामुळे आता नांदगाव ग्रामीण रुणालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर काय कारवाई होते, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

# गोंदिया जिल्ह्याचे झेंडे पावरलिफ्टिंगमध्ये उंचावले; गोल्ड्स जिमच्या खेळाडूंनी सोने, चांदी आणि कांस्य पदकांची लयलूट!

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिला प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------




छत्तीसगडमधील रायपूर येथे पार पडलेल्या वेस्ट झोन इक्विप्ड अँण्ड क्लासिक पावरलिफ्टिंग, बेंचप्रेस व डेडलिफ्ट स्पर्धेमध्ये गोंदिया जिल्ह्यातील प्रसिद्ध गोल्ड्स जिमच्या सहा खेळाडूंनी अतुलनीय कामगिरी करत जिल्ह्याचे नाव उज्वल केले आहे.

या स्पर्धेत सुमारे ३०० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. मात्र, गोंदियाच्या पावरलिफ्टर्सनी ३ सुवर्ण, २ रौप्य आणि १ कांस्य अशा एकूण ६ पदकांची कमाई करत धमाकेदार यश संपादन केले.

**पदक विजेते खेळाडू पुढीलप्रमाणे**

महिला सब-ज्युनियर – ६७.५ किलो गटात राधिक शर्मा हिने सुवर्ण पदक पटकावले.

महिला ज्युनियर – ४८ किलो गटात विद्या पटले हिला सुवर्ण पदक, तर लव्हीना मट्टानी हिला कांस्य पदक प्राप्त झाले.

पुरुष सब-ज्युनियर – ६० किलो गटात जय मट्टानी याला रौप्य पदक.

पुरुष सीनियर – ७५ किलो गटात मिनेश कलचुरी याने बेंच प्रेसमध्ये सुवर्ण पदक, तर सागर डोये याने बेंच प्रेसमध्ये रौप्य पदक पटकावले.

हर्ष ग्वालबंशी व चिन्मय हिरडे यांनी देखील उत्कृष्ट कामगिरी करून उपस्थितांचे लक्ष वेधले.

या खेळाडूंना गौरवण्यासाठी गोल्ड्स जिमतर्फे भव्य स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. खेळाडूंना सन्मानचिन्ह व मेडल देत गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ऍड. योगेश अग्रवाल बापू (अध्यक्ष, गोंदिया शहर काँग्रेस व बापू युवा संघटना – केंद्रीय अध्यक्ष) होते, तर मुख्य अतिथी म्हणून अविनाश बजाज (अध्यक्ष – एमेच्योर पावरलिफ्टिंग असोसिएशन) उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून सचिन शेंडे (माजी नगरसेवक), संगीत शिक्षक विनोद शरणागत, व जिम मालक प्रमोद शरणागत (मामू) उपस्थित होते.

या सर्व यशस्वी कामगिरीमागे गोल्ड्स जिमचे मालक व सर्टिफाइड फिटनेस ट्रेनर केदार शरणागत यांचे मार्गदर्शन, कष्ट आणि प्रेरणा मोलाची ठरली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देखील त्यांनीच केले.

**कार्यक्रमात उपस्थित मान्यवर**

उर्वशी फडके, सुयश शिव, चैताली चव्हाण, हर्षी हरिनखेड़े, पल्लवी राणे, हिमानी ठाकरे, भर्ती फुंडे, खुशाल बावनथडे, आयुष कटरे, मंगेश राहुत, अमन तिगाला, शिवम् दहीकर, रचित तुपकर, अजय पटले, नितेश बचपई, शीला डोये, शीतल बडोले, सुधांशु टमरे, अरुण पटले, तुलीचंद पटले, किरण पटले, गायत्री शर्मा, विनोद हिरडे, वैशाली फडके, दीक्षा शरणागत, सरोज शरणागत.

गोल्ड्स जिमच्या पावरलिफ्टर्सनी गोंदिया जिल्ह्याला दिलेले हे गौरवाचे क्षण प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरत आहेत!

# रावेर वनक्षेत्रात रोपवन निधीचा सुमारे 18 लाखांचा अपहार? निलंबीत वनरक्षक रमेश भुतेकर यांनी मांडला गंभीर आरोप

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------

धुळे वनवृत्त अंतर्गत येणाऱ्या रावेर (प्रा.) वनक्षेत्रातील भरीव वनीकरण योजनेंतर्गत सन २०२३ मध्ये लागवड केलेल्या रोपवनाच्या दुसऱ्या वर्षासाठी मंजूर निधीतून अंदाजे १८, २२, ८३० रुपये नियमबाह्यरित्या खर्च करून शासकीय निधीचा अपहार केल्याचा गंभीर आरोप निलंबीत वनरक्षक श्री. रमेश अरुण भुतेकर यांनी आपल्या निवेदनाद्वारे केला आहे. श्री. भुतेकर यांनी धुळे वनसंरक्षक (प्रा.) यांचेमार्फत सादर केलेल्या निवेदनात तत्कालीन सहा. वनसंरक्षक (प्रा. व कॅम्पा) श्री. प्रथमेश विठ्ठल हाडपे आणि वनक्षेत्रपाल रावेर (प्रा.) श्री. अजय नारायण बावणे यांच्यावर संगनमताने निधी अपहार केल्याचा आरोप केला आहे. त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत शिस्तभंगाची कार्यवाही व्हावी, अशी मागणी केली आहे.

निधी खर्चाचा संदिग्ध कालावधी

श्री. भुतेकर यांनी निदर्शनास आणून दिले आहे की, दुसऱ्या वर्षातील रोपवन कामे 'कॅलेंडर ऑपरेशन'नुसार ऑक्टोबर महिन्यात नियोजित होती (दुसरी निंदणी व मातीचा भराव). मात्र संबंधित अधिकाऱ्यांनी १४ ऑगस्ट २०२४ रोजीच काम पूर्ण झाल्याचे दाखवून निधी खर्च केल्याचे रोखालेखा व प्रमाणकावरून स्पष्ट होते.

अपूर्ण रोपांची देखील भरपाई?

रोपांची प्रत्यक्ष लागवड केवळ १५, ००० असल्याचे सत्य असताना, २७,५०० रोपांची कामे केल्याचा दाखला देत निधी उचलण्यात आला असल्याचा आरोपही श्री. भुतेकर यांनी केला आहे. त्यामुळे १२,५०० न लागवड केलेल्या रोपांचा निधीही अपहृत झाला आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

एकाच संस्थेला वारंवार दिले काम

सदर निवेदनात आणखी एक गंभीर बाब नमूद करण्यात आली आहे – रोपवनाच्या विविध कामांसाठी एकाच दौलत मजूर सहकारी संस्थेला मोठ्या प्रमाणावर कामे दिली गेली असून, रक्कमांच्या अदा संदर्भात स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही, असा उल्लेख आहे. त्यामुळे रोखीकरणाची शक्यता नाकारता येत नाही.

वरिष्ठ अधिकार्यांचे संकेत व दबाव?

श्री. भुतेकर यांनी असा दावा केला आहे की, यावल उपविभागात सहायक वनसंरक्षक पदावर लवकरच दुसरे अधिकारी (श्री. समाधान पाटील) पदस्थापित होणार असल्याची माहिती मिळताच श्री. हाडपे यांनी हा निधी तातडीने खर्च करण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे श्री. बावणे यांनी ऑक्टोबरमध्ये करावयाचे काम अगोदरच दाखवले व पैसे खर्च केले.

निवेदनाची मागणी

श्री. भुतेकर यांनी त्यांच्या निवेदनात ही संपूर्ण घटना ही शासकीय निधीच्या गैरवापराचा संगनमताचा प्रकार असून, यामध्ये दोषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करावी व चौकशी दरम्यान अर्जदारासही उपस्थित राहण्याची संधी द्यावी, अशी मागणी केली आहे.

जर योग्य कार्यवाही झाली नाही, तर त्यांनी महाराष्ट्र उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करण्याचा इशाराही दिला आहे.

# विद्यार्थ्यांनो चांगल्या सवयी अंगीकारा... भविष्य उज्वल असेल. प्रा. संतोष परदेशी सर (व्याख्याते)

पल्लवी शेलार
श्रिगोंदा तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
---------------------

विद्यार्थीदशेत चांगल्या सवयी लागणे गरजेचे आहे. जसे लवकर उठणे, लवकर झोपणे, व्यायाम करणे, उत्साहाने वागण्याची, बोलण्याची सवय, अपयशातून शिकण्याची सवय, अवांतर वाचनाची सवय, खरं बोलण्याची सवय, इ.चांगल्या सवयी व्यक्तीमत्व घडवण्यासाठी उपयोगी पडतात. आयुष्यात चांगले मित्र व मार्गदर्शकाची भूमिका महत्त्वाची आहे. मित्राचे अनुकरण तो पटकन करतो. त्यामुळे त्याला जीवनात चांगले मित्र मिळणे गरजेचे आहे. एकदा चुकीची सवय लागली तर ती दूर करणे अवघड होते. व्यक्ती हा अनुकरण प्रिय आहे. अलिकडील काळात खाण्याच्या सवयी बदलेल्या आहेत.मुलांना फास्ट फूड आवडत आहे.मात्र त्याचे तोटे व परिणाम लक्षात येत नाहीत. पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करून वाढदिवस खूप मोठ्या प्रमाणात साजरे केले जात आहेत. दिव्याला पवित्र मानणारे आपण वाढदिवसाच्या दिवशी टाळ्या वाजवून त्या मेणबत्तीच्या दिव्याला फुंकर मारतो.हे ही न पटणारे आहे.वाढदिवस करण्यास हारकत नाही.परंतू त्यामुळे बदलणारी आपली संस्कृती याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.आई, वडील यांच्या कष्टाची जाणीव असणे गरजेचे आहे.आई वडील जर सतत डोळ्यासमोर ठेवून काम केले तर उच्च ध्येय गाठता येते.आई, वडील गुरूजन यांनी दाखवून दिलेल्या मार्गाने चालणे गरजेचे आहे.कारण ते आपले हित पाहत असतात.जरी ते रागावले तरी ते आपल्यावर निस्वार्थ भावनेने प्रेम करत असतात.त्याच्या रागवण्या मागे आपले हित असते.परंतू अलीकडील मुलांमध्ये प्रचंड राग आहे.त्यामुळे रागावर नियंत्रण मिळवणे गरजेचे आहे.चिडचिडपणा हा घातक आहे हेही लक्षात येणे गरजेचे आहे..शालेय जीवनात मोबाईल गरजेचा नसताना करमणूक म्हणून मुले त्यांच्या आहारी जात आहेत.रिलच्या नादात ही पिढी वेगळ्या दिशेने जात आहे.शालेय जीवनात पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञान गरजेचे असताना मुले मोबाईलच्या आहारी जाऊन गेम, रिलच्या नादात दिशाहीन तर होत नाही ना याकडे सर्वांनी लक्ष देणे गरजेचे आहे.शालेय जीवनात मोबाईल पासून दूर राहून अवांतर वाचनाची गोडी निर्माण करून यशस्वी व्यक्तीचे आत्मचरित्र अभ्यासणे गरजेचे आहे.जे विद्यार्थी चांगल्या सवयी लावून योग्य दिशेने जातील त्याचा भविष्य काळ उज्ज्वल असेल.पालकांनी मुलांचे लाड पुरवत असताना त्यांना आवश्यक शैक्षणिक गरजा पूर्ण करणे गरजेचे आहे.मात्र पैसे आहेत म्हणून त्यांना आवश्यक नसणाऱ्या गोष्टी देऊ नये .शिक्षक हे मुलांच्या हिताच्या गोष्टीं सांगत असतात.त्याचा आदर करणे गरजेचे आहे.शिक्षक हे मुलांच्या भविष्यासाठी रागवत असतात.त्यांचा राग मनात न धरता त्यांच्याशी आपलेपणाने वागणे गरजेचे आहे.ते आपले हितचिंतक आहेत हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे.आज समाजात यशस्वी व्यक्ती गुरूंच्या मार्गदर्शनामुळेच झालेल्या आहेत.त्यामुळे गुरूंचा आदर करणे महत्त्वाचे आहे.जीवनात यशस्वी होयचे असेल तर नम्रता महत्त्वाची आहे.चांगल्या सवयी लावूया जीवन आनंदमय सुखमय करूया.संतानी म्हटलंच आहे कुळी कन्या पुत्र होती जे सात्त्विक तयाचा हारिक वाटे देवा.

# गावगाडाकार तात्यासो. साहेबराव नंदन यांची नुकतीच प्रसिद्ध झालेली विरह कवितेवरचे रसग्रहण

वयाच्या अखेरच्या पर्वास कवीला प्रेयसीची आठवण झाली आहे. गात्र गलीत झाली आहेत. सरणावर अर्थातच प्रियकर आता अंथरूनावरच खिळून पडला आहे.वार्धक्याकडे कवी व प्रेयसी झुकले असून प्रियकराला नवा डाव मांडणे आता शक्य नाही.तरीही या वयात तिच्या शिलाला, चारित्र्याला व एकूणच तिच्या संसाराला कुठली आच येऊ देणार नाही, ही ग्वाही या वयात इथे देत आहे. खरं म्हणजे तारुण्यातच प्रेयसी दुसऱ्या व्यक्तीशी विवाहबद्ध झाल्याने ती आता तिच्या नवऱ्यासोबत सुखाने नांदत आहे. आणि त्या सुखाच्या संसारात तिच्या कपाळावरती शोभणारा कुंकू तिचा सुखी संसाराचा दाखला देत आहे.आणि म्हणून कवी इथे थोडा संभ्रमित होताना मला दिसतो आहे.

स्वतःच प्रश्न विचारून गोंदणावर हक्क कसा सांगणार हा प्रश्न कवी विचारत आहे.इतके सारे माहीत असूनही, कवी पुन्हा एकदा तारुण्याच्या जुन्या आठवणींकडे सहजपणे वळण्याचा प्रयत्न करतो आणि तिला नव्याने भेटण्याची आशा व्यक्त करतो, याचाच अर्थ तारुण्यात या दोघांनी एकमेकांना भेटून विचारांची , विषयाची,संवादाची, तृप्तीची देवाण घेवाण तृप्तीची पेरणी केली असल्याचे यातून नकळत सूचित होते. सरणावरती जाण्याची चाहूल लागली असताना सुद्धा जुन्या काळातील आपल्या प्रेयसीला भेटण्याचे बहाने अजूनही शोधतो आहे.ही खरी प्रेमाची भूक आहे. याचा अर्थ तीव्रवासनेची उर्मी तर दिसून येते नाहिना ? कदाचित कवीला आपल्या प्रेयसीला किमान शेवटी डोळे भरून पाहण्याची इच्छा असावी. आणि म्हणून ते तिला भेटण्यासाठी आजही पूर्वी प्रमाणे बहाणे शोधतांना दिसतो. एकीकडे भेटण्याची आस निर्माण करणारा कवी गत आठवणींना उजाळा न देण्याची इच्छा व्यक्त करतो,तारुण्यात एकमेकांना भेटी दरम्यान कदाचित कपाळावरगोंधळलेल्या त्या स्मृतींना जागविण्याची इच्छा असूनही आठवणी काढण्याचे नाकारत आहे. तरीही भेटलेल्या त्या रात्रीच्या क्षण मधुर सहवासाचे गंध अजूनही दरवळतो आहे,ही साक्ष देतो. याठिकाणी कवी पुन्हा द्वंदात सापडला आहे की काय ? . सहजीवनाची गाठ बांधता आली नाही म्हणूनच रूखवताच्या पराती रित्या गेल्याची खंत कवी व्यक्त करतो.कवी अतिशय केविलवाणा होऊन तिला पुन्हा नव्याने भेटण्याचे बहाने शोधून भेटशील का पुन्हा नव्याने ? असा प्रश्न विचारतो आहे. या सगळ्या आठवणींच्या गोंधळात अडकलेला कवी आषाढ धारेत भर पावसात केसांमध्ये गजरा माळण्याचा प्रयत्न करतो.

आषाढ हा तप्त उन्हाचा महिना असला तरी नक्की पावसाने चिंब होते की घामाने चिंब होते हे मात्र तिच्या आठवणीत मनाच्या हिंदोळ्यावर बसून हेलकावे खाताना दिसत आहे .या सुखी प्रेमाला कोणाची दृष्ट लागली असा सवाल विचारत इथे पुनवेचा चंद्र प्रतिमा त्यांनी समर्पक वापरली असून चांदणे अंधारात न्हाऊन काळोखाचा वापर या ठिकाणी प्रेमाला अपयश आल्याच्या खुणा येथे दिसतात. मनाच्या हिंदोळ्यावर हेलकावे खाणारा कवी गत आठवणींना कसे जपावे? असा प्रश्न विचारून लव्हाळे ही प्रतिमा योग्य वापरली आहे. प्रचंड पूर येऊनही लव्हाळे आपले अस्तित्व टिकून ठेवतात तसेच मनाच्या या प्रचंड हेलकाव्यात नंतरही तिच्या गत स्मृतींना आठवणींना त्याने लव्हाल्यासारखे टिकून ठेवले असल्याचे चिन्ह दिसत आहेत.

भेगाळल्या भुईला व उसवल्या नात्याला कवी स्वतःला भार समजत असून या ठिकाणी भुई भेगाळाने म्हणजेच ती प्रचंड प्रेमाने तहानलेली आहे. आणि यामुळे तहानलेली भूमी ही उसवते त्यामुळे त्या जमिनीवर कुठल्याही प्रेमाचे रोप उगवू शकत नाही. भुई ही प्रतिमा कशी वापरली असावी ? प्रेयसी ही प्रीतीच्या वर्षावाची भुकेली दिसते. शुष्क प्रेम हा तो केवळ भार असल्याचे स्वतःवरच आरोप करीत आहेत. कवी स्वतःचं अस्तित्व ही संपवण्याच्या मानसिक तयारीत असून केवळ आपल्या गत जीवनातील प्रेयसीला भेटून तिच्या स्पर्शाची अखेरची इच्छा इथे व्यक्त करतो. आणि म्हणून तिचा स्पर्श हाच त्याचा आधार असल्याचे नमूद करत अखेरचा भार मानत आहे. वार्धक्याकडे झुकूनही त्या सुरकत्या पडलेल्या कांतीच्या स्पर्शाला अजूनही कोमल स्पर्श समजत आहे. प्रेमाचा भुकेला आहे. पुन्हा कवी आपल्या या गत जीवनातील प्रेयसीला पुन्हा नव्याने भेटशील का ? हा प्रश्न विचारत तो भेटण्याचे बहाने शोधतो आहे. ती आस मात्र त्याच्या मनात कायम आहे. कवीने पदराला आच येऊ देणार नाही ही ग्वाही दिली आहे. सरण व गलित गात्र या उपमांचा वापर करत भाळीच्या गोंधळावर या शब्दांचा पुनर्वापर दिसतो. एकमेकांना कुशीत घेऊन रात्र ओशाळली असली तरी भेटीचे मधुर क्षण हे एकमेकांना न बोलता उपभोगले असल्याचे दिसून येते. पराती हा हा शब्द थोडा वेगळ्या पद्धतीने वापरला असला तरी ते विवाहाच्या आठवणी कवीला नक्कीच सतावत आहेत.आषाढ मास हा अतिशय उष्ण व ढगाळलेला असतो. बरसल्या पावसातही गजरा माळण्याचा धाडस कवी सहजपणे करतो.

हिंदोळा ही प्रतिमा वापरून कवी च्या मनाची घालमेल खूपच झालेली आहे. अंधारात चांदणे न्हाले ही उपमाच काही और आहे. एकूणच कवीला अखेरची घरघर लागली असून सुद्धा प्रेयसीच्या भेटीची व तिच्या कोमळ स्पर्शाची आस तितकीच दांडगी आहे. एकार्थाने कवीवर्य साहेबराव नंदन तात्यांचा वयाच्या बासष्ठी मध्ये मुक्तछंद प्रकारातील प्रेमविरह रचना प्रयत्न खूप चांगला निभावला आहे. पुढील साहित्य सेवेस खूप खूप शुभेच्छा.

**राजेंद्र गवळी, पिंपळनेर**

# हरणमाळ येथील जि. प. शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

नंदुरबार प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------



नवापूर तालुक्यातील श्रावणी केंद्र अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरणमाळ शाळेमध्ये आंतरराष्ट्रीय योगा दिन अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणामध्ये संपन्न झाला. यावेळी योगा टीचर गोपाल गावीत, मुख्याध्यापक छोटी पाटील यांचे मार्गदर्शनाखाली योग प्रशिक्षण कार्यक्रम झाला. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा चंद्रकला गावीत, ग्रामपंचायत सदस्य कल्पेश गावीत, शिक्षक पालक संघ व ग्रामस्थ तसेच विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. शिक्षकांनी योगाची आवश्यकता, योगाचे महत्त्व याविषयी सखोल मार्गदर्शन केले. त्यावेळी बोलताना मुख्याध्यापक छोटी पाटील म्हणाले की योग ही भारताची जगाला मिळालेली एक देणगी आहे. आपले आरोग्यमान चांगले राहावे म्हणून आपण नियमित योग साधना करायला हवी, तरच आपण दीर्घायुषी होऊ शकतो. विद्यार्थ्यांनी योगसाधना केल्यास विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता विकसित होऊ शकते. चांगले मानसिक स्वास्थ्य लाभते. आरोग्यमान सुधारते. त्यावेळी योगा टीचर गोपाल गावीत यांनी योगाविषयक विविध योग प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांकडून करून घेतली. विद्यार्थ्यांनी त्यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी योगा टीचर गोपाल गावीत म्हणाले की, योगाचे मानवी जीवनातील स्थान अनन्यसाधारण असे आहे. योग साधनेने आपले मानसिक स्वास्थ्य चांगले राहू शकते. हल्लीच्या या धकाधकीच्या जीवनामध्ये योगसाधना करणे ही काळाची गरज आहे. ग्रामीण भागापासून ते शहरापर्यंत योगाचे महत्व पटवून देणे ही काळाची गरज आहे आणि म्हणूनच २१ जून हा उत्तर गोलार्धातील वर्षातील सर्वात मोठा दिवस असतो. तर दक्षिण गोलार्धातील हा दिवस सर्वात लहान असतो. त्यामुळे जगभरातील अनेक भागामध्ये या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. परंतु याच दिवशी सूर्याचे दक्षिणायन सुरू होते आणि याच दिवशी सर्वात पहिला योगी म्हणून गणला जाणाऱ्या शंकराने योगविषयीचे ज्ञान जगासमोर आणले. म्हणून २१ जून हा आंतरराष्ट्रीय स्तरावर योग्य दिन साजरा करण्यात येतो. असेही मत व्यक्त केले. यावेळी सर्व मुलांचे शारीरिक व्यायाम व उत्तेजक हालचाली आणि योगासने सर्व शिक्षक आणि विद्यार्थी यांनी केली.

# मुंगसे येथील स्वामी विवेकानंद संस्थेचे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयातील डी.फार्मसीच्या विद्यार्थ्यांची परीक्षेमध्ये यशाची परंपरा कायम

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-------------------



मालेगाव तालुक्यातील मुंगसे येथील स्वामी विवेकानंद संस्थेचे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयातील डी. फार्मसी च्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी परीक्षा २०२५ मध्ये घवघवीत यश संपादन केले. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई तर्फे औषधनिर्माणशास्त्र पदविका [ डी. फार्मसी ] उन्हाळी परीक्षेचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून त्यात डी. फार्मसी महाविद्यालयातील अंतिम वर्षात प्रथम क्रमांक जगताप हर्षदा ८५. ३६%, द्वितीय क्रमांक निकम निकिता ८३. १८%, तृतीय क्रमांक पगार गायत्री ८२. ७३% गुण मिळवून उत्तीर्ण झाल्या. तसेच प्रथम वर्षात सूर्यवंशी विद्या ८२. ६०%, द्वितीय क्रमांक सूर्यवंशी प्रांजली ८१. ९०%, तृतीय क्रमांक सूर्यवंशी सिद्धेश्वरी ७४. ८० % गुण मिळवून उत्तीर्ण झाल्या. डी फार्मसी च्या द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचा ९५% निकाल लागला तर प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा ९१% निकाल लागला. डी फार्मसी चा एकूण सरासरी ९३. ०० % निकाल लागला. स्वामी विवेकानंद संस्थेचे सेक्रेटरी श्री. राजेंद्र रामचंद्र सूर्यवंशी, स्वामी विवेकानंद संस्थेच्या अध्यक्षा सौ. संगीता राजेंद्र सूर्यवंशी , तसेच स्वामी विवेकानंद संस्थेचे विश्वस्त श्री. सुजित सूर्यवंशी, सौ. रुचिता सूर्यवंशी व फार्मसी कॉलेजचे प्राचार्य एम. बी. निकम यांनी उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. सर्व शिक्षक, शिक्षकत्तर कर्मचारी यांनी पण सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आंधळगाव पोलिस स्टेशनच्या कमानावर नवा शिलेदार!

## नितीन राठोड ठाणेदारपदावर रुजू होताच कारवाईचा धडाका – 21.48 लाखांचा मुद्देमाल जप्त

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत
----------------------



मोहाडी तालुक्यातील आंधळगाव पोलीस स्टेशनच्या सूत्रधारपदाची जबाबदारी नुकतीच पोलीस निरीक्षक नितीन राठोड यांनी स्वीकारताच त्यांच्या कडक कारभाराची झलक पहिल्याच दिवशीच दिसून आली आहे. सालई खुर्द येथून अशोक पटले, नितीन लिल्हारे, उपसरपंच ईश्वर बोन्द्रे, एमरीत ठाकरे, रामकरण दमाहे आणि प्रफुल्ल मेश्राम यांनी पोलीस ठाण्याला भेट देत ठाणेदार राठोड यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले आणि त्यांच्या कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. पूर्वी कार्यरत सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील राऊत यांनी शांतता व कायदा-सुव्यवस्थेच्या राखणीत मोलाची कामगिरी बजावली होती. त्यांच्या जागी आता मुंबईतून बदलीवर आलेले नितीन राठोड यांनी सूत्रे हाती घेतली असून आंधळगाव परिसरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर धडक कारवाईचा इशारा दिला आहे. राठोड यांनी रुजू होताच जुगार अड्ड्यावर छापा टाकत तब्बल २१.४८ लाखांचा मुद्देमाल जप्त करून अवैध धंद्यांच्या मूळावर घाव घातला. त्याचप्रमाणे अवैध जनावरे वाहतूक, दारू व्यवसाय, सट्टा, जुगार यावर कठोर कारवाईचे संकेत दिले असून त्यामुळे स्थानिक गुन्हेगारी प्रवृत्तीचे धाबे दणाणले आहेत. नवीन ठाणेदाराच्या आक्रमक आणि शिस्तबद्ध कार्यपद्धतीमुळे आंधळगाव परिसरात कायदा-सुव्यवस्थेच्या बाबतीत नव्या युगाची सुरुवात झाली असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. राठोड म्हणजे कायदा तोडणाऱ्यांसाठी वज्राहुंकार, तर सामान्यांसाठी आश्वासक चेहरा!

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# गड-किल्ल्यांच्या जपणुकीसाठी 'किल्ले स्पर्धा' गरजेची अभिजीत पाचर्णे; ५० हून अधिक स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------------



आजच्या सोशल मीडियाच्या युगात मुलांना इतिहासाची जाणीव करून देणे अत्यावश्यक झाले असून, विशेषतः गड-किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व नव्या पिढीपर्यंत पोहचवण्यासाठी 'किल्ले स्पर्धा' सारख्या उपक्रमांची आवश्यकता आहे, असे स्पष्ट मत शिरूर नगर परिषदेचे बांधकाम समितीचे माजी सभापती अभिजीत पाचर्णे यांनी व्यक्त केले. मातोश्री कला क्रीडा प्रतिष्ठान यांच्या वतीने २०२४ मध्ये आयोजित केलेल्या किल्ले स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा माजी नगरसेवक अभिजीत पाचर्णे आणि श्रीकृष्ण उद्योग समूहाचे उद्योजक सागर नरवडे यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडला.

कार्यक्रमावेळी मातोश्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभिजीत आंबेकर, पत्रकार सतीश धुमाळ, मुकुंद ढोबळे, शैलेश जाधव, सतीश केदारी, प्रमोद वाघचौरे, साजिद शेख, किरण आप्रे यांच्यासह विजेते स्पर्धक व इतर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सागर नरवडे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, > "गड-किल्ल्यांचे जतन व संवर्धन करणाऱ्या या स्पर्धा मुलांना प्रेरणा देणाऱ्या आहेत. सोशल मीडियाच्या आहारी गेलेल्या नव्या पिढीसाठी या प्रकारचे उपक्रम आवश्यक आहेत. श्रीकृष्ण उद्योग समूह या स्पर्धेला भविष्यातही संपूर्ण पाठिंबा देईल."

या किल्ले स्पर्धेत ५० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. विजेते स्पर्धक पुढीलप्रमाणे

प्रथम क्रमांक : युवा संघर्ष गणेश मंडळ, मुंबई बाजार
द्वितीय क्रमांक : सायेशा आढाव
तृतीय क्रमांक : काव्या बाफना
चतुर्थ क्रमांक : सिद्धांत मुथा
पंचम क्रमांक : सिद्धार्थ पठारे
षष्ठ क्रमांक : श्रुती डहाळे

प्रत्येक सहभागी स्पर्धकाला सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाचे स्वागत शैलेश जाधव यांनी केले, सूत्रसंचालन सतीश धुमाळ यांनी तर आभार प्रदर्शन सतीश केदारी यांनी केले.

या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक जागांची ओळख आणि त्याबद्दल आत्मीयता निर्माण झाली असून, पुढील वर्षी ही स्पर्धा अधिक भव्य स्वरूपात घेण्यात येईल, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली.

# शिवसेनेच्या ५९ वा.वर्धापन दिनानिमित्त दहिवेल येथे भव्य रक्तदान शिबिर व विद्यार्थ्यांना वह्या वाटप कार्यक्रम संपन्न

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



दिनांक २२ वार रविवार रोजी शिवसेना वर्धापन दिनानिमित्त दहिवेल येथे साक्री तालुक्याच्या आमदार सौ मंजुळाताई गावित व धुळे जिल्हा शिवसेनाप्रमुख डॉ. तुळशीराम गावित यांच्या अध्यक्षतेखाली व युवा नेते सागर दादा गावित यांच्या उपस्थितीत शिवसेनेच्या ५९ वा वर्धापन दिन शिवसेनेच्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळेस युवा नेते सागर दादा गावित यांच्या मार्गदर्शनाने शालेय विद्यार्थ्यांत्यांचे भवितव्य उज्ज्वल घडविण्यासाठी वह्या वाटप करण्यात आल्या. तसेच "शिवसेना वर्धापन दिनानिमित्त मा. उपसरपंच, शिवसेना तालुकाप्रमुख श्री अमोल भाऊ सोनवणे यांच्या नियोजना खाली भव्य असे रक्तदान शिबिर घेण्यात आले या शिबिरात जवळजवळ शंभरहून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले. व सर्व रक्तदात्यांना आमदार सौ मंजुळा ताई गावित यांच्या हस्ते सन्मानपत्र देण्यात आले" तसेच अपंग व्यक्तींना सायकल वाटप, हातगाडी व्यवसायिकांना उन्हाळा पावसाळ्यापासून बचाव करण्यासाठी आमदार मंजुळाताई यांच्या हस्ते छत्री वाटप करण्यात आली. तसेच महिला भगिनींचे ब्लड ग्रुप व हिमोग्लोबिन चेक अप करण्यात आले. व दहिवेल व दहिवेल परिसरातील तसेच दहावी बारावी वर्गात चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना व सामाजिक कार्यकर्त्यांचा तसेच शिक्षक व शेतकरी, दहिवेल येथील पत्रकार बंधू यांचा आमदार ताई व डॉ.तुळशीराम गावित यांनी "कॉमन मॅन" म्हणून शाल श्रीफळ व ट्रॉफी देऊन सत्कार केला. या कार्यक्रमासाठी शिवसेना उपजिल्हाप्रमुख श्री ज्ञानेश्वर एखंडे, श्री हिम्मत साबळे, मनू गावित, शिवसेना विधानसभा संघटक संभाजी अहिरराव, तालुकाप्रमुख श्री अमोल भाऊ सोनवणे, युवा सेना तालुकाप्रमुख मंगलदास सूर्यवंशी, सरपंच अजय सोनवणे, शिवसेना महिला आघाडी प्रमुख संगीता ताई पगारे, सुनिता ताई सूर्यवंशी, शिवसेना तालुकाप्रमुख रंजना ताई बच्छाव, तसेच पिंपळनेर व दहिवेल येथील युवा सेना शिवसेना पदाधिकारी उपस्थित होते.

# जवानाचा एल्गार! "२३ जूनला अतिक्रमण मी स्वत: हटवणार सरकार झोपा काढत असेल, तरी मी झोपू देणार नाही!"

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------



'कुराडी' गावातून थेट प्रशासनाला हादरा! वीर जवानाचा संतप्त इशारा! कोर्टाचा आदेश धुळीला! ग्रामपंचायतीचा मुजोर हट्ट! सैनिकाच्या घरचा रस्ता बंद १५ वर्षांचा अन्याय! गोंदिया जिल्ह्यातील कुर्हाडी या गावातून स्फोटक सत्य समोर आलंय – देशासाठी सीमेवर रक्त सांडणाऱ्या सैनिकाच्या स्वाभिमानावर, त्याच्या घरच्या रस्त्यावर अतिक्रमण करून गदा आणली गेलीय! सैनिक निरंजन श्रावन येरने – SSB जवान, सध्या सिक्कीमवरून जम्मू-काश्मीरला बदलीवर! पण गावाकडं त्याचं वडिलोपार्जित घर – जिथे जायचंही त्याला मुश्कील झालंय. कारण दोन कुटुंबांनी अतिक्रमण करत १२ फूट रस्ता फक्त २.५ फूटांवर आणला!

कोर्टाचा आदेश, तहसीलदारांचा निकाल, पोलिसांची नोंद – सगळ्यांना ग्रामपंचायतीने दाखवलं ठेंगा! १६ जून २०२५ ला येरने यांनी शेवटचं निवेदन दिलं आणि थेट शब्दांत धमका दिली: > "२३ जून रोजी मी स्वत: अतिक्रमण हटवणार! आणि काहीही घडलं, तर जबाबदार फक्त आणि फक्त सरपंच आणि ग्रामपंचायत असेल!" "माझ्या प्रेतयात्रेसाठी तरी रस्ता मोकळा ठेवा!" – जवानाची हृदयद्रावक साद येरने यांनी लिहिलं: "मी परत येईन की नाही, हे माहीत नाही. पण मी मरेन तेव्हा… कमीत कमी माझ्या मृतदेहाला तरी रस्ता मिळावा, हीच माझी शेवटची इच्छा आहे!" देशासाठी बलिदान देणाऱ्या जवानाच्या घराला रस्ता नाही? हाच का आहे 'वीर सैनिकांचा गाव' म्हणवणाऱ्या कुर्हाडीचा चेहरा? आता ही लढाई 'रस्त्याची' नाही – ही लढाई 'स्वाभिमानाची' आहे! तहसीलदार आदेश देतात – दुर्लक्ष! कोर्ट निकाल देतं – थट्टा! पोलिसात तक्रारी – पण प्रशासन झोपेत! ही म्हणजे जवाबदारी झटकणारी व्यवस्था आणि सरळ सरळ देशसेवकांचा अपमान! सैनिकाचा धगधगता एल्गार – "२३ तारखेला मी स्वत: जेसीबी घेऊन येईन!" कुठल्याही अघटित प्रसंगाची पूर्ण जबाबदारी

सरपंच
ग्रामपंचायत
आणि झोपलेलं प्रशासन!
दस्तऐवज काय सांगतात?
ग्रामपंचायतीचे ठराव
तहसीलदारांचे आदेश
जिल्हा न्यायालयाचा निर्णय
पोलीस ठाण्याची नोंदवही

पण कोणताही आदेश प्रभावी ठरत नाही, कारण अधिकाऱ्यांचा नुसता टेबलवरचा ठसा – जमिनीवर अंमलबजावणी नाही!

प्रश्न फक्त येरने यांचा नाही – हा भारताच्या प्रत्येक जवानाचा आहे! ज्याचं सर्वस्व देशासाठी… पण घराकडे जाण्याचा रस्ताही मिळत नाही… हे युद्ध शांततेचं नाही – हे युद्ध न्यायाचं आहे! सावधान प्रशासन! "जर २३ जूनच्या आत रस्ता मोकळा झाला नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रात हे प्रकरण पेटेल – आणि ठिणगी जिथं उडेल, तिथं कोसळेल संपूर्ण व्यवस्थेचा बुरुज!"

अर्ज पोहोचवले गेले आहेत: ग्रामपंचायत कुराडी ,पोलीस स्टेशन गोरेगाव, तहसील कार्यालय ,पंचायत समिती ,जिल्हाधिकारी गोंदिया

आणि आता – मीडिया आणि महाराष्ट्रातील जनता! हा येरने यांचा नाही – आपल्या सगळ्यांच्या आत्मसन्मानाचा लढा आहे!

# अंकुश देसाई देगावकर यांच्यासह कार्यकर्त्यांचा अजित पवारांच्या गटात प्रवेश

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

----------------------



देगलूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला (शरद पवार गट) मोठा धक्का बसला आहे. तालुकाध्यक्ष ॲड. अंकुश देसाई देगावकर यांनी आपल्या असंख्य समर्थकांसह पक्षाला रामराम ठोकत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश केला. नांदेड येथील आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या निवासस्थानी रविवारी हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

या प्रसंगी आमदार प्रतापराव चिखलीकर यांनी देसाई आणि त्यांच्या समर्थकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तालुकाध्यक्षपदावर कार्यरत असताना देसाई यांचा हा निर्णय राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

देसाई यांच्यासोबत रमेश शिवनीकर, सौ. तारकेश्वरीताई पाटील, शशांक पाटील, अच्युत पाटील, अशोक देशमुख, गुलाब पाटील, माधव दासवाड, राजू पाटील मलकापूरकर, कृष्णा माळेगांवकर आदी कार्यकर्त्यांनीही अजित पवार यांच्या गटात प्रवेश केला.

या कार्यक्रमाला माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, मोहनअण्णा हंबर्डे, अविनाश घाटे, व्यंकटराव पाटील गोजेगांवकर, दिलीपराव धर्माधिकारी, रामदास पाटील सुमठाणकर, शिवराज पाटील होटाळकर, राहुल देसाई देगांवकर, यादवराव देसाई, अनिकेत पाटील राजूरकर, संतोष सावकार नारलावार यांचीही उपस्थिती होती.

# ॲड.अर्चना धवलचंद्र आढाव महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------









नांदगाव शहरातील ॲड अर्चना आढाव यांना संस्कृती मंत्रालय, राष्ट्रीय आधुनिक कला संग्रहालय तसेच युनि जी आय एफ आयोजित वार्षिक शिक्षण समिट २०२५ अंतर्गत महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. सदर सन्मान २१जून २०२५ रोजी नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट्स, फोर्ट, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाकरिता प्रमुख अतिथी नामदार मंगल प्रभात लोढा -कौशल्य ,रोजगार, उद्योजकता मंत्री, श्री प्रेम शुक्ला वरिष्ठ भाजप नेता ना.ॲड आशिष शेलार व आयएएस ऑफिसर निधी चौधरी - भारतीय संस्कृती मंत्रालय हे उपस्थित होते. तसेच डॉक्टर रचना भीमराजका मॅडम-युनिक ग्लोबल इंटेलेक्चुअल संस्था चेअरमन, बिपिन गुप्ता- सृष्टी फाउंडेशन डायरेक्टर मुंबई तसेच डॉक्टर सरिता गोम्स एम व्ही आय हायस्कूल प्राचार्य हे उपस्थित होते. विविध क्षेत्रातील मान्यवरांना महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नाशिक विभागातून ॲड अर्चना आढाव यांचे मातृभाषेतून इंग्रजीकडे हे १६ भाषिक पुस्तकास अनुसरून शैक्षणिक क्षेत्रात महाराष्ट्र रत्न सन्मान हा पुरस्कार देण्यात आला आहे. त्याबद्दल सर्व स्तरातून ॲड आढाव यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर अनिता गुप्ता यांनी केले. ॲड अर्चना आढाव यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

# निकृष्ट कामाचा कळस ;२१ कोटींच्या रस्त्याची पहिल्याच पावसात धुळधाण पिंपळनेरातील जे.टी.पॉइंट ते चौफुली रस्ता महिनाभरात बनला खड्डेयुक्त

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------





नागरिकांना चांगल्या पायाभूत सेवा-सुविधा मिळाव्यात यासाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करते.जनतेच्याच पैशातून ही विकासकामे होत असतात.मात्र, जिकडे तिकडे खादाड वृत्ती फोफावली असल्याने निकृष्ट विकासाचा डोलारा उभा रहात आहे. पिंपळनेरातही याचा अनुभव येत आहे.गेल्याच महिन्यात एमएसआरटीसीकडून पिंपळनेर येथील जे.टी.पॉइंट ते चौफुलीपर्यंतचा १.५ कि.मी. चा रस्ता करण्यात आला. त्यासाठी तब्बल २१ कोटी रुपये खर्ची घालण्यात आले. मात्र, पहिल्याच पावसात या रस्त्याची धुळधाण उडाली आहे.नागरिकांच्या वाट्याला पुन्हा खड्डेमय रस्ता आल्याने जनतेतून प्रचंड संताप व्यक्त होत आहे.

पिंपळनेर शहरातील जे.टी. पॉइंट ते चौफुलीपर्यंतच्या रस्त्याची अतिशय दुरवस्था झालेली होती.या रस्त्यावरुन ये-जा करणे म्हणजे अपघाताला निमंत्रण देणारे ठरत होते.त्यामुळे आंदोलनांच्या माध्यमातून या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न वेळोवेळी करण्यात आला होता.सदर रस्ता हा एमएसआरटीसी नाशिक यांच्या अखत्यारित येतो.अखेर पावसाळ्याला सुरवात होण्यापुर्वी म्हणजे गेल्याच महिन्यात या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले. सदर १.५ कि.मी. रस्त्यासाठी तब्बल २१ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला.

**पहिल्याच पावसात रस्ता गेला वाहून..**

या रस्त्याचे डांबरीकरण झाल्यानंतर नागरिकांना हायसे वाटले होते.परंतु, वरवर चकाचक दिसणारा रस्ता आतून किती ढिसाळ व निकृष्ट आहे, याची कल्पना कुणालाही नव्हती.मात्र,पहिल्याच पावसात या रस्त्याचे पितळ उघडे पडले आहे.पावसाच्या पाण्यामुळे रस्ता उखडून पुन्हा खड्डेमय बनला आहे.या रस्त्याला ठिकठिकाणी खड्डे पडले असून त्यात पाण्याचे डाबके साचले आहे. शिवाय अनेक ठिकाणी रस्त्यासाठी वापरलेली बारीक खडी वर येवून रस्त्यावर पसरली आहे. त्यामुळे रस्ता तयार करताना किती प्रमाणात डांबर वापरले होते, वापरले होते की नाही, असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे. रस्ता तयार होत असताना तो नियमानुसार होतोय की नाही, यावर संबंधित यंत्रणा वॉंच ठेवत नाही.त्यामुळे ठेकेदाराच्या माध्यमातून अशी निकृष्ट कामे केली जात असल्याचा आरोपही नागरिकांमधून होत आहे. कोट्यवधींची कामे अशा निकृष्ट पध्दतीने करुन जनतेचा पैसा वाया घालविला जात असल्याने हेच का 'अच्छे दिन' असेही नागरिक आता उपरोधाने म्हणू लागले आहेत. हा रस्ता म्हणजे निकृष्ट कामाचा कळस असून संपूर्ण रस्ता नियमानुसार तयार करावा तसेच दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# श्री जंगले पाटील यांच्या मार्गदर्शनाने साक्री तालुक्यात शिवपानद रस्ता चळवळीला आले मोठे यश संपादन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------





ब्रिटिश कालीन शिवपानंद शेत रस्त्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव पानद शेत रस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे व महाराष्ट्र राज्य शिवा पानद शेत रस्ता चळवळीचे राज्य सन्मनक श्री जंगले पाटील यांनी शेत तिथे रस्ता व गाव तिथे समृद्धी अभियानाच्या माध्यमातून राज्यभर जनजागृती करत राज्यव्यापी चळवळ उभी करून ग्राम शासन, तालुका प्रशासन, जिल्हा प्रशासन, राज्य शासन यांना निवेदन वेगवेगळे आंदोलनाच्या माध्यमातून राज्यातील शेत रस्त्याच्या ज्वलंत प्रश्नासाठी सरकारचे लक्ष वेधले त्याचाच एक भाग म्हणून आज साक्री तालुक्यातील वासखेडी गावातील शेतकऱ्यांना न्याय मिळाला व शेतात जाण्यासाठी रस्ता मोकळा झाला. मा.तहसीलदार साहेब साक्री यांनी१६/०५/२०२५ रोजी रस्ता करण्यास आदेश दिला. त्या प्रमाणे मंडळ अधिकारी श्री. बाविस्कर यांनी ११/०६/२०२५ रोजी समोरच्या पार्टीस व आम्ही राजेंद्र पुंजू कुंवर, साहेबराव पुंजू कुवर,भालचंद्र आनंदा कुवर व श्रीमती लीलाबाई आनंदा कुवर यांना हजर राहून रस्ता काढण्यास आदेश दिलात्या ११/०६/२०२५ रोजी मा. तहसीलदार साहेब साक्री यांच्या आदेशा प्रमाणे मंडल अधिकारी श्री.बाविस्कर साहेब , तलाठी श्री.बागुल साहेब,श्री.मोरे साहेब निजामपूर पोलिस स्टेशन येथून श्री. भामरे साहेब यांनी बंदोबस्त साठी दोन पुरुष व एक महिला पोलिस पाठवले होते व त्या दिवशी रस्ता खुला झाला. या रस्त्यासाठी शेतकऱ्यांनी स्वतः खर्च केला कारण की सध्या पावसाळ्याच्या दिवसात पेरणीसाठी बैलगाडी नेण्यासाठी रस्ताच नव्हता त्यामुळे त्या शेतकऱ्यांनी स्व खर्च करून रस्ता तयार करून घेतला शासनावर अवलंबन न राहता शासनाकडूनही रस्ता मिळाला असता परंतु त्याला वेळ गेला असता. या कामासाठी शासकीय यंत्रणा, पोलीस कर्मचारी, तलाठी, सर्कल व शेत रस्ता चळवळीचे श्री शरद पवळे व जंगले पाटील यांचे कुवर परिवाराने आभार मानले.

# देगलूर महाविद्यालयात करियर कट्टाद्वारे सौर ऊर्जा दिन उत्साहात साजरा

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
---------------------

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलुर महाविद्यालय देगलुर येथे सौर ऊर्जा दिनाचे औचित्य साधून सौर ऊर्जा जनजागृती अभियान राबवीण्यात येत आहे. त्यानिमित्य आज सोलार उर्जेचे महत्त्व व फायदे याविषयावर उद्बोधन कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ अनिल चिद्रावार, डॉ एम एम पटेल, डॉ व्ही जी शेरीकर, पर्यवेक्षक संग्राम पाटील उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने *"करिअर कट्टा"* या उपक्रमांतर्गत सोलर एनर्जी सोसायटी ऑफ इंडिया आणि विवा कॉलेज, विरार यांच्या सहकार्याने ऑनलाईन 'Solar Energy Awareness Program





या विषयावर प्रशिक्षण दैन्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी मार्गदर्शन करताना पर्यावरण संरक्षण संवर्धनासाठी सौरऊर्जेचे संवर्धन करणे गरजेचे आहे आणि करिअर कट्ट्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दररोज एक आयएएस अधिकारी मार्गदर्शन करीत असतात त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तराचे एक उद्योजक ऑनलाइन मार्गदर्शन करीत असतात.

करिअर कट्ट्याचा जास्तीत जास्त विद्यार्थयानी लाभ घेऊन आपल्या जीवनात यशस्वी व्हावे असे आवाहन केले याप्रसंगी लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. बी आर कतूरवार आणि भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भानुदास नरवाडे यांनी सोलार ऊर्जा उपयोग, आर्थिक बचत, केंद्र शासनाकडून प्राप्त होणारी सबसीडी, पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनामध्ये सोलार पॅनलचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले आणि प्रत्येकाने आपल्या घरावर सोलर पॅनल बसउन पर्यावरण संरक्षणाचे एक मूलभूत कर्तव्य पार पाडावे असे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी मोटार सायकल खरेदी करताना पेट्रोल ऐवजी सौर ऊर्जेवर चालणारी मोटार सायकल खरेदी केली पाहिजे यासंदर्भात मार्गदर्शन केले करिअर कट्टाचे समन्वयक डॉ. माधव चोले यांनी सूत्रसंचालन केले तर करिअर कट्ट्याचे सहसवनयक डॉ. सुरेश काशीदे यांनी आभार मानले. यार्प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# बांधकाम कामगारांच्या पाल्यांना मिळणार मोफत टॅब, लॅपटॉप

राज रावणगाकर
हडपसर प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत
--------------------

महाराष्ट्र शासनाच्या बांधकाम कामगार कल्याण मंडळाची नवी योजना ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना टॅब, तर १० वी पुढील विद्यार्थ्यांना लॅपटॉप जिल्ह्यातील ६५ हजार बांधकाम कामगारांना होणार फायदा शिराळा शहर पुढमी व ससेवा महाराष्ट्र शासनाने २०२५ मध्ये बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या अंतर्गत चीणीकृत कामगारांच्या मुलांसाठी महत्वाची जैक्षणिक योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. लवकरच पाची अंमलबजावणी होणार असूर, या योजनेतर्गत पात्र विद्यार्थ्यांना मोफत व आणि संपवितरित केले जाणार आहेत. किल्ल्यात सुमारे १५जार नोंदणीकृत बांधकाम कामगार आहेत यापूर्वी त्यांना ३० भांडवला गेला आहे बांधकाम कामगारांसाठी प्रवेश घेतलेल्या पाल्यांसाठी महाराष्ट्र विविध कल्याणकसी शासनविद्या संकटॉप प्रदान केले जाणार पोजल्यामुळे शिक्षणात तंत्रज्ञाना आहेत. यापूर्वी बांधकाम कामगारांना साहित्य पेटी दिली जात होती ३० संदला जात आहे. त्यांना शिष्यकृती दिली जात असून, आता कामगारांच्या पाचवी ते दिले जाणार आहेत. या योजनेबाबत अंमलबाजवणी करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. लवकरच गावात परिपक प्रसिद्ध होणार आहेत केले नाही. कारण या वयोगटातील फायदा घेता येणार आहे. रहिवासी दाखला आवश्यक... एका कार्डधारकाच्या कुटुंबातील फक्त दोन मुलांना या योजनेचा लाभ मिळेल. तीन किया अधिक मुले असल्याआधीच्यांना लाभ मिळणार आहे. हा लाफ महाराष्ट्राच्या मूवराज्यातून कामाच्या निमिताने आलेल्या कामालाही यासाठी डोमिसाईत सर्टिफिकेट दाखला आवश्यक आहे. आवश्यक कागदपत्रे... बांधकाम कामगार कल्याण मंडळाचे सक्रिय कार्ड दीडोमिसाईल सर्टिफिकेट दहावीचे गुणपत्रक मुलाचे शैक्षणिक दाखले पुढील शिक्षणाचा प्रवेश दाखला बैंक पासबुकची प्रत सरकारची ही योजना दुर्लक्षितकयांसाठी नवसंजीवनी आहे किल्यात ६५ हजार बांधकाम कामगार आहेत. त्यामुळे अनेक विद्याध्यांना संपटॉप बजारमुळे त्यांचे भविष्य सुखकर होईल. परिस्थितीशी दोन हात करून गुजराण करणारे हे कामगार आता मुलांच्या हातात खोरे पाटी नाही तर पट पाहतील. असे महाराष्ट्र राज्य माथाडी बांधकाम व जनरल कामगार संघटना हडपसर अध्यक्ष आर.एस. रावणगावकर, कार्याध्यक्ष बालिका विशाल निरगुडे, उपाध्यक्ष संगीता विशाल लोकरे यांनी म्हटले.

# गुलताई फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड संचालित वाघदेव भाजीपाला मार्केटमध्ये' एक शेतकरी, एक झाड ' संकल्पनेतून १०१ हापूस आंब्यांचे वाटप

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------

साक्री तालुक्यांतील सितारामपूर येथील गुलताई फार्मर प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड संचालित वाघदेव भाजपाला मार्केटने आज एक स्तुस्य उपक्रम राबवत , ग्रामीण भागाच्या विकासासाठी आणि पर्यावरणाच्या संवर्धनासाठी एक महत्त्वाचे पाऊल टाकले . या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या वृक्षारोपण आणि वृक्ष वाटप कार्यक्रमाला परिसरातील शेतकरी आणि मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थित होते .

या प्रेरणादायी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी प्रेरणा पुरस्कार प्राप्त ,वीरखेल येथील माननीय श्री.भटू विनायक भदाणे हे होते. त्यांचा अनुभवाच्या



मार्गदर्शनाने कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली . तसेच , प्रमुख पाहुणे म्हणून माजी पंचायत समिती सदस्य. श्री. काळु शंकर पवार (मंडाणे ), श्री दिलीप पवार ( मंडाणे) संजय भदाणे (वीरखेल) , श्री गुलाब शंकर पवार (मंडाणे) , आणि हिरालाल भदाणे ( विरखेल ) हे उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढवली . यावेळी ,गुलताई फार्मर प्रोडयुसर कंपनीचे अध्यक्ष श्री राजमान भोये आणि सचिव सौ हिरा भोये यांनी पुढाकार घेऊन "एक शेतकरी , एक झाड" ही अभिनव संकल्पना प्रत्यक्षात आणली . या संकल्पने अंतर्गत , सर्व उपस्थित सभासदांना तब्बल १०१ केसर आंब्याची रोपे वाटप करण्यात आली . कंपनीचे सदस्य सै मालती पवार , श्री भिमराव पवार, अजय चौधरी , अरुण गवळी, संजय ठाकरे यांच्यासह इतर सर्व सभासद आणि कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित राहून त्यांनी या उपक्रमाला पाठिंबा दर्शवला . या उपक्रमा मागील बो उद्देश स्पष्ट करताना श्री राजमल भोये यांनी सांगितले की, " आपल्या ग्रामीण भागातील निसर्गरम्य आणि आरोग्यदायी वातावरण टिकवून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे .त्याचबरोबर , या झाडांपासून मिळणाऱ्या फळांमुळे शेतकऱ्यांना एक नवीन आणि शाश्वत रोजगाराची संधी उपलब्ध होईल . यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बरकटी मिळेल ." ज्या कोणत्याही शेतकऱ्यांना अजूनही झाडांची आवश्यकता असेल, त्यांनी वाघदेव मार्केट, मंडाणेयेथे संपर्क साधून रोपे मिळावावीत , असे आवाहनही याप्रसंगी करण्यात आले . या कार्यक्रमामुळे केवळ पर्यावरणाचे रक्षणच नाही , तर शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक स्थौर्यआणण्याची एक नवी दिशा मिळाली आहे.

# सामाजिक न्याय दिनानिमित्त गुरुवारी समता दिंडीचे आयोजन विद्यार्थ्यांनी दिंडीत सहभाग नोंदविण्याचे आवाहन

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
------------------------

राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिन २६ जून हा सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करण्यात येतो. सामाजिक न्याय दिनानिमित्त २६ जून २०२५ रोजी सकाळी ८ वा. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिनानिमित्त समता दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या समता दिंडीमध्ये जिल्ह्यातील महाविद्यालय व शाळेतील विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण नांदेड कार्यालयामार्फत सामाजिक न्याय दिवस साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त समता दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळयास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन समता दिंडीची सुरवात होईल. या समता दिंडीचा मार्ग महात्मा ज्योतिबा फुले पुतळा, स्नेहनगर ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुतळा असा असून, राजर्षी छत्रपती शाहू महाराज पुतळा येथे दिंडीचा समारोप होईल.

# किसानहितासाठी पुन्हा एकदा रणशिंग फुंकले!

## विधायक विनोद अग्रवाल यांची रब्बी हंगामातील धान खरेदीचे लक्ष्य वाढविण्याची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे ठाम मागणी

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------

गोंदियातील लोकप्रतिनिधी आणि स्पष्टवक्ते विधायक विनोद अग्रवाल यांनी पुन्हा एकदा शेतकऱ्यांसाठी आक्रमक भूमिका घेत थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन रब्बी हंगामातील धान खरेदीचे सरकारी लक्ष्य तात्काळ वाढविण्याची ठोस मागणी केली आहे.

धानाचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोंदिया जिल्ह्यात यंदा अपेक्षेपेक्षा अधिक धानाचे उत्पादन झाले आहे. मात्र शासनाने जाहीर केलेले खरेदीचे लक्ष्य अत्यंत कमी असून हे शेतकऱ्यांच्या श्रमांवर अन्यायकारक असल्याचे स्पष्ट चित्र आहे.

कमी लक्ष्य, अधिक समस्या विधायक अग्रवाल यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, मर्यादित लक्ष्यामुळे अनेक शासकीय सब-एजंट संस्थांमध्ये खरेदी सुरू असली तरीही हजारो शेतकऱ्यांचे धान अजूनही बिल प्रक्रियेच्या अडचणीत अडकले आहे. याचा थेट फटका शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर आणि आत्मविश्वासावर बसतोय."उत्पादन जास्त आणि बाजारभाव कमकुवत असताना



सरकारच शेवटची आशा असते. अशा वेळी कमी खरेदी लक्ष्य ठेवणे म्हणजे शेतकऱ्यांशी अन्यायच,"
विधायक विनोद अग्रवाल

बाजार कोसळला, व्यापाऱ्यांची खरीदी ठप्प मुक्त बाजारात धानाला मिळणारा दर अत्यंत खालावलेला असून खासगी व्यापाऱ्यांकडून खरेदी नाममात्र आहे. अशा स्थितीत जर सरकारी खरेदीही मर्यादितच राहिली, तर हजारो क्विंटल धान शेतातच कुजण्याची भीती निर्माण झाली आहे.

मुख्यमंत्री यांच्याकडे विधायकांची ठोस मागणी

गोंदिया जिल्ह्यातील रब्बी हंगामाच्या धान खरेदीचे लक्ष्य तात्काळ वाढवावे

खरेदी प्रक्रिया वेगवान व सुलभ करावी

मार्केटिंग फेडरेशन व सब-एजन्सींना स्पष्ट निर्देश द्यावेत की, कोणत्याही अडथळ्यांशिवाय धान खरेदी व्हावी

शेतकऱ्यांमध्ये नवा आत्मविश्वास

विधायक अग्रवाल यांच्या या पावलाने गोंदिया जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये नवी आशा जागवली आहे. गावोगावी त्यांच्या पत्राची चर्चा रंगली असून अनेक शेतकरी संघटना त्यांच्या पाठिशी उभ्या ठाकल्या आहेत.

एक शेतकरी नेते म्हणाले,
“विनोदजींचं पत्र ही काळाची गरज आहे. जर शासनाने तातडीने निर्णय घेतला नाही, तर हजारो शेतकऱ्यांच्या धानाला बाजारच उरणार नाही.”

विश्लेषण: हे फक्त एक पत्र नाही, ही शेतकऱ्यांची हुंकार आहे!

जेव्हा एखादा जनप्रतिनिधी मतांच्या राजकारणापलीकडे जाऊन जमिनीवरील प्रश्नांची तळमळ दाखवतो, तेव्हा ती चळवळ होते. विधायक विनोद अग्रवाल यांचे हे पाऊल शासनाला जागं करण्यासाठी दिलेला इशाराच म्हणावा लागेल.

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरकार किती तत्परतेने निर्णय घेते, हे पाहणे आता अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

# राष्ट्रीय सेवा योजना एककच्या वतीने विमलबाई कॉलेज साक्री येथे आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
-----------------------



दि २१ जुन रोजी त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै डॉ भास्कर सदाशिव देसले विज्ञान महा साक्री येथिल रासेयो एककाच्या वतिने आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला या कार्यक्रमासाठी योग प्रशिक्षण घेतलेले योगगुरू डॉ जी. जे . पावरा यांनी महाविद्यालयातिल कर्मचारी व रासेयो स्वयंसेवकांना विविध योग प्रात्यक्षिके प्रत्यक्ष सादरीकरण केले व शरीरासाठी प्रत्येक योग प्रकाराचे महत्त्व स्पष्ट केले त्याचबरोबर शाररीक व मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवायचे असेल तर योगा शिवाय पर्याय नाही तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मा प्राचार्य डॉ पी. एस सोनवणे यांनीही स्वतः अनुभवलेले अनुभव व्यक्त केले व योग नियमित करत असल्याने मला स्वतःला बी. पी. ची गोळी नियमित होती मात्र आता ती बंद झाली त्यामुळे कोणत्याही गंभिर आजारावर सुद्धा योगा मुळे सहज विजय प्राप्त करता येवु शकते व शरीर स्वास्थ्य शंभर टक्के प्राप्त करता येवु शकते त्यामुळे सर्वांनी योगा करा व परिवार तसेच समाजात घराघरा पर्यंत याचे महत्व पोहविण्याचे आव्हान केले .सदर कार्यक्रमाचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ अभिजित भामरे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ अजय नांद्रे महिला कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ करूना आहिरे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षण कर्मचारी उपस्थित होते .

# डॉ. ललिता रघुनाथ जाधव यांना आंतरराष्ट्रीय सन्मान; अमेरिका इंटरन□शनल युनिव्हर्सिटीकडून सन्माननीय डॉक्टरेट पदवी प्रदान शिक्षण क्षेत्रातील कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-----------------------

शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, हॉलीवूड, कॅलिफोर्निया (USA) यांच्यातर्फे डॉ. ललिता रघुनाथ जाधव यांना सन्माननीय डॉक्टरेट पदवी (H o n o r a r y Doctorate in Education) प्रदान करण्यात आली आहे.

या पदवीचे वितरण युनिव्हर्सिटीच्या शिक्षण विभागाच्या नियमानुसार करण्यात आले असून, संस्थेच्या सिनेटने डॉ. जाधव यांचे शैक्षणिक आणि सामाजिक योगदान अत्यंत प्रशंसनीय असल्याचे मान्य केले आहे. त्यांच्या कार्यामध्ये धार्मिक तत्त्वांचा व नैतिक मूल्यांचा प्रभाव असून, समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी दिलेले योगदान लक्षणीय असल्याची नोंद करण्यात आली आहे. ही पदवी युनिव्हर्सिटीचे संस्थापक आणि कुलगुरू डॉ. सांग वोन पार्क यांच्या अधिकृत सहीने प्रदान



करण्यात आली असून, या गौरवप्रसंगी श्री. क्युंग बाय आन (नोंदणी अधिकारी) यांची विशेष उपस्थिती होती.

**पदवी क्रमांक: AIU/६०७५/२०२५**
**पदवी प्रदान दिनांक: १८ जून २०२५**
**स्थळ: अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, हॉलीवूड, कॅलिफोर्निया, USA**

**डॉ. ललिता जाधव : एक प्रेरणादायी प्रवास**

डॉ. ललिता रघुनाथ जाधव या मूळच्या बल्हाणे (ता. साक्री, जि. धुळे) येथील असून, सध्या त्यांचा मुक्काम पिंपळनेर येथे आहे. ग्रामीण व प्रतिकूल परिस्थितीतून पुढे आलेल्या डॉ. जाधव यांनी शिक्षण, प्रशिक्षण व सामाजिक क्षेत्रात अतुलनीय कार्य केले आहे. त्यांनी विशेषतः ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या कुटुंबांचे जीवन सकारात्मकपणे बदलले आहे. डॉ. जाधव यांचा आत्मसन्मान, शिस्तप्रियता, कार्यतत्परता आणि समाजहितासाठी असलेली तळमळ यामुळे त्या अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरल्या आहेत. त्यांचे योगदान केवळ शैक्षणिकच नाही, तर सामाजिक परिवर्तनाचेही प्रतीक बनले आहे. स्थानिक समाजात अभिनंदनाची लाट या आंतरराष्ट्रीय सन्मानामुळे बल्हाणे गाव, साक्री तालुका, धुळे जिल्हा तसेच पिंपळनेर परिसर याठिकाणी डॉ. जाधव यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. त्यांच्या या यशस्वी प्रवासामुळे त्या अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरल्या आहेत.

# महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

## स्वराज्यदुत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान...

स्वराज्याचा मान !!




महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदुत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

**ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित**

### प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत dainikswarajyadoot@gmail.com या इ-मेल वर पाठवायचा आहे.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

**8446673677 / 8010232449**